# आपत्ती व्यवस्थापन आणि नेतृत्व विकास कार्यशाळा



कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी डॉ. गुणवंत सरवदे, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. ए. व्ही. साखरे, प्रा. डॉ. एस. एस. मेटकरी आणि मान्यवर

आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. नैसर्गिक आपत्ती सांगून येत नाही, त्यासाठी अशा आपत्तींचे पूर्वनियोजन करणे गरजेचे आहे. या व्यवस्थापनात युवकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. युवकांनी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेऊन यामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. गुणवंत सरवदे यांनी केले.

संगमेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन आणि नेतृत्व विकास या विषयावर आयोजित तीन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी सरवदे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य होत्या. राष्ट्रीय सेवा योजना ही शाखा विद्यार्थ्यांमधील नेतृत्व गुणाला वृद्धिंगत करण्यासाठी विविध उपक्रम राबविते. यात श्रमसंस्कार जसे महत्त्वाचे आहेत, त्याचप्रमाणे आपत्ती व्यवस्थापनासारख्या विषयावर त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. संस्कारातून प्रबोधन घडत असते. सकारात्मक दृष्टी फार महत्त्वाची आहे. कोणतेही ध्येय गाठण्याची ती पहिली पायरी आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी याच मार्गाने आपला विकास करावा, असे आवाहन सरवदे यांनी केले. प्रास्ताविक समन्वयक प्रा. ए.व्ही. साखरे तर सूत्रसंचालन श्रेया माशाळ यांनी केले. यावेळी डॉ. के.डी. गायकवाड, डॉ. एस.एस. मेटकरी, डॉ. एम.बी. बगले, डॉ. एम.डी. संगेपांग, डॉ. सुहास गाडे आदी उपस्थित होते. ऐश्वर्या कांबळे यांनी आभार मानले.